# एकच प्याला
## व
# भावबंधन

राम गणेश गडकरी

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**एकच प्याला व भावबंधन : राम गणेश गडकरी**

© **प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८ ई वॉर्ड, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
मे, २०१२

**किंमत**
रुपये २६०/-

---

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

---

# एकच प्याला

# एकच प्याला

भारतीय स्त्रीच्या पातिव्रत्याचे सामर्थ्य आणि जगद्विख्यात आंग्ल नाटककार शेक्सपियरच्या शोकात्म नाट्यकृतींच्या वैशिष्ट्यांचा सर्वांगाने प्रादुर्भाव या दोहोंचा मनोहर संगम म्हणजे गडकऱ्यांची ही अजोड साहित्यकृती.

नायकाच्या व्यक्तिमत्त्वातून साकारलेली नियतीची भीषणतेकडे नेणारी क्रीडामयता, त्याच्या अनावर विकाराची नाट्यपूर्ण विलसिते आणि अंतिमतः त्याला आपल्या प्रमादांचे झालेले अभिज्ञान आणि वाक्यावाक्यांतून ओसंडणारी काव्यमयता ही शेक्सपियरप्रणीत शोकनाट्याच्या आंतररचनेची नेमकी नस पकडणारी अशी ही मराठीतील एकमेवाद्वितीय कृती होय.

सुधाकराचा अंतिम अधःपात हा केवळ त्याच्या स्वभावातील क्षुल्लक प्रमादाचा परिपाक नसून तो सिंधूच्या असाधारण पातिव्रत्यातून संक्रमित झालेला दाखवून गडकऱ्यांनी आपल्या स्वतंत्र प्रतिभेची चुणूकही दाखविली आहे.

नाट्यरचनेतील समतोल, चार्वाकी बाण्याचा नाट्यवस्तूला पोषक ठरलेला विनोद आणि नितळ, पारदर्शक भाषा या सर्वांतून गडकऱ्यांनी घेतलेली झेप मराठी नाट्यवाङ्मयात सदैव तळपत राहील अशी आहे.

गडकऱ्यांच्या नाट्यलेखनकर्तृत्वाचा परमोच्च विकास या कृतीने साधला आहे.

श्रीशं वंदे

# संगीत

# एकच प्याला

मंगलाचरण

(राग–भूप, ताल–झपताल, चाल–अमरवर नमित पद.)

शरण तें करुण तव निःश्वसन व्यसनिं घन।
नंदनंदन! जनां पापकामां ।। हो ।। ध्रु० ।।
कलहरत करि यदा मद्यमद यादवा ।।
सकल कुल कलि तदा ने विरामा ।।
हानि ती पाहतां दृष्टि बाष्पाकुला ।
सृष्टि कष्टद तुला सौख्यधामा! ।। १ ।।
कर्मरेखाबलें धर्म नच मज कळे ।
न स्मरत मतिहि तव पुण्य नामा ।।
रक्षणीं मम तरिहि दक्ष राहुनि सदा ।
अक्षय स्वपदिं पद देइ रामा ।। २ ।।

# अंक पहिला
## प्रवेश पहिला

(स्थळ : सुधाकराचें घर. पात्रें : सुधाकर दूरध्वनिकां (टेलिफोन) यंत्राजवळ बसला आहे.)

**सुधाकर :** कोण तीनतीनदां घंटा देत आहे? कोण? (ऐकून) हो, मी सुधाकर आहें! सुधाकर! पण बोलतं आहे कोण? रामलाल! (पुन्हा ऐकून) हो, तिच्याकडून सर्व तयारी आहे. तूं ल लवकर चल. सिंधू, जरा इकडे ये पांहू! सिंधू!

**सिंधू :** हें काय भलतंच? आपलं नांवानंच हांक मारीत सुटायचं?

**सुधाकर :** तर काय तुझं नांव टाकूं? मग तूंच उलटी माझ्या नावानं हांका मारीत सुटशील! हें पाहा, भाईसाहेबांनी आतां विचारलं आहे त्याच्या निघण्याची सर्व तयारी आहे का म्हणून? तो येईलच इतक्यांत.

**सिंधू :** तयारी सर्व आहे; पण भाई जाणार म्हणून कुठल्या कामाला उत्साह कसा तो वाटत नाही.

**(राग : यमन; ताल : त्रिवट. चाल : येरी आली पिया बिन.)**

**लागे हृदयीं हुरहुर । अजि ।**<br>
**सुखविषय गमति नच मज सुखकर ।। ध्रु० ।।**<br>
**कांही सुचेना । कांही रुचेना ।**<br>
**राहि कुठें स्थिर मति नच पळभर ।। १ ।।**

**सुधाकर :** वृष्टीपूर्वीची अभ्रें जमूं लागली का? सिंधू, असं म्हणून कसं चालेल? ज्या जगांत आपण आलों आहों, तें इतकं चमत्कारिक आहे कीं, त्यांतल्या नुसत्या चांगल्या गोष्टींचीच अपेक्षा करायला निरंतर नुसत्या दुःखांत दिवस काढावे लागतील!

**(राग : छायानट; ताल : त्रिवट, चाल : नाचत धी धी०)**

**सुखचि सदा कधिं मिळत न कवणा । मिश्ररूप जग ।**<br>
**सुखचि रिघे अघ । दुःखांतुनि हो जन्म सुखांना ।। ध्रु० ।।**

**हो जरि आशा मात्र सुखवशा । करित विधी तरी अंति निराशा ।।**
**रत मतिही नच प्राप्त सुखिंहि मग । करि अवमाना ।। १ ।।**

केव्हांहि उत्साह सोडून चालायचं नाही. शिवाय रामलालभाई जातो आहे तो केवढ्या महत्त्वाच्या कामासाठी! या प्रसंगी आपण त्याला आपल्या निरुत्साहानं असं तद्रूप करायचं! वाः आपण तर उलट त्याचा उत्साह द्विगुणित केला पाहिजे.

**सिंधू** : भलतंच सोंग कसं आणता येईल असं? पुरुषांना पाषाणहृदयाचे म्हणून म्हणतात. ते असं एखादे वेळी खरं वाटायला लागतं! आपल्याला नाहीं वाईट वाटत?

**सुधाकर** : माझ्या पाषाणहृदयावर रामलालच्या गत-उपकारांचे शिलालेखच तुला पाहायला मिळतील. तुझ्या माहेरच्या माणसांचा आणि भाईचा नुसता स्नेहसंबंधच असेल; पण मला तर तो वडिलांच्या ठिकाणी आहे. रस्त्यानं चालतां चालतां रामलालचं नांव लक्षांत आलं म्हणजे मला एक ब्रह्मांडच्या ब्रह्मांड आठवतं. मी सोळा वर्षांचा असेन नसेन, माझी प्रवेशपरीक्षा उतरण्याच्या आधीच बाबांनी स्वर्गप्रवेश केला; आपला वृद्धापकाळ झाला असं पाहून आपल्या पश्चात शरद्च्या संगोपनाची जबाबदारी माझ्यावर पडूं नये म्हणून बाबांनी तिचा आठव्या वर्षीच तिचं लग्न लावून दिलं; परंतु लग्नाच्या सोळाव्या दिवशींच तिचं दुर्दैव तिच्या पुढं उभं राहिलं; नवऱ्याच्या मुळावर आलेली मुलगी, म्हणून तिच्या सासऱ्यानं तिला आमच्या घरीं कायमची परत लावून दिली! आईबापावेगळीं आम्ही दोन पोरकीं मुलं! पैशाचं पाठबळ नाही आणि आप्तेष्टांचा आधार नाही! त्या वेळी रामलाल देवासारखा माझ्या पुढं उभा राहिला! माझ्या मानी स्वभावामुळं माझ्या शिक्षणासाठी मीं त्याची प्रत्यक्ष मदत कधीं घेतली नाहीं हे खरं; परंतु शरद्ला सांभाळण्याची जबाबदारी मात्र त्यानं माझ्यावर फारशी पडूं दिली नाही; पुढं शिकवण्या वगैरे पत्करून माझ्या शिक्षणक्रमांतून शेवटपर्यंत मी यशस्वी रीतीनं पार पडलो; पुढं तुझ्या वडिलांना भाईनंच आग्रह करून आपला हा भाग्यशाली योग घडवून आणला. हे सोन्याचे दिवस आज आपण पाहतों आहों, याचं कारण एक रामलालची कृपा! सिंधू, आज सकाळपासून ही सारी गोष्ट हृदयांत सारखी उचंबळत आहे! कोणापाशी बोलल्याखेरीज राहवेना; म्हणून तुला ती जणूं काय अगदी नव्यानंच म्हणून विस्तारानं सांगत सुटलो! रामलाल जाणार म्हणून मला वाईट वाटल्याशिवाय कसं राहील? परंतु या संसारात नेहमी परिणामाकडे दृष्टी ठेवून चालावं लागतं! आपण अशी दुर्मुखल्यासारखीं बसलो आणि समज, एकदम रामलाल आला.

(रामलाल येतो.)

**सिंधू** : भाई, तुला शंभर वर्षे आयुष्य आहे!